# श्रीगोंद्याच्या भूमिपुत्राचा नाशिककरांकडून सन्मान



**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील महत्त्वाची सहकारी संस्था असलेल्या मढेवडगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी बापूसाहेब वाबळे यांची नुकतीच दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली. त्यांच्या निवडीचा आनंद व्यक्त करण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील मित्रमंडळी थेट श्रीगोंद्याला येऊन त्यांचा सन्मान केला.


बापूसाहेब वाबळे यांची इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी असून त्या माध्यमातून ते राज्यातील विविध जिल्ह्यांत कृषी प्रदर्शनांचे आयोजन करतात. त्यामुळे राज्यभर त्यांचा मोठा मित्रपरिवार तयार झाला आहे. त्यांच्या निवडीची बातमी सोशल मीडियावर समजल्यानंतर नाशिक जिल्ह्यातील त्यांच्या घनिष्ठ मित्रांनी श्रीगोंद्याला येत त्यांचा सन्मान केला. नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांच्या पुढाकाराने कारखाना परिसरात चेअरमन बापूसाहेब वाबळे व व्हॉईस चेअरमन दत्तात्रय झुंजुरुक यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. याच कार्यक्रमस्थळी नाशिकहून आलेल्या मान्यवरांनीही वाबळे यांचा सन्मान केला. या प्रसंगी नाशिक जिल्हा परिषदेचे गटनेते तसेच चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. आत्माराम कुंभार्डे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वाल्मिक वानखेडे, राजेंद्र ठाकरे, चांदवड खरेदी-विक्री संघाचे संचालक पुंडलिक गुंजाळ, रविंद्र ठाकरे, विजय कुंभार्डे, पन्हाळेचे सरपंच बाबुराव कुंभार्डे, दिगवनचे सरपंच रावसाहेब गांगुर्डे, उरदोळचे सरपंच श्रीहरी ठाकरे, जोपुळचे सरपंच दिबंबर वाघ, नारायणगावचे सरपंच सिताराम मांदळे यांसह चांदवड तालुका, जि. नाशिक येथील अनेक मान्यवर उपस्थित होते. एवढ्या दूरवरून वाबळे यांच्या सन्मानासाठी आलेल्या या मान्यवरांचे आगमन पाहून कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे, संचालक सुभाषकाका शिंदे, सरपंच प्रमोद शिंदे तसेच आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थांना विशेष आनंद झाला.

कार्यक्रमात बोलताना डॉ. आत्माराम कुंभार्डे यांनी नाशिक जिल्ह्यात वाबळे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, वाबळे यांनी चांदवड तालुक्यातील अनेकांच्या मनात आपल्या कामातून स्थान निर्माण केले आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व राजकारणात आलेले पाहून आश्चर्य वाटले, परंतु राजू दादांबद्दल असलेल्या प्रेमामुळेच ते या क्षेत्रात आले असावेत. तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक वाल्मिक वानखेडे यांनी वाबळे यांचा गौरव करताना, "वाबळे हे परिसासारखे आहेत. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तीचे सोने झाल्याशिवाय राहत नाही," असे गौरवोद्गार काढले.

कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी उपस्थित सर्व पाहुण्यांचा सन्मान करताना सांगितले की,"एवढ्या दूरवरून माझ्या कार्यकर्त्यांच्या सन्मानासाठी आपण येथे आलात, ही अभिमानाची बाब आहे. वाबळे हे आमचे निष्ठावंत व विश्वासू सहकारी असून त्यांनी गेल्या पाच वर्षांत संस्थेचा कारभार अत्यंत उत्तमरीत्या सांभाळत संस्थेचा नावलौकिक वाढवला आहे." या कार्यक्रमाला कारखान्याचे संचालक सुभाष शिंदे, सरपंच प्रमोद शिंदे, उपसरपंच दत्तात्रय उंडे, माजी चेअरमन प्रकाश उंडे, रावसाहेब जाधव, जयसिंग मांडे, काकासाहेब मांडे, राहुल साळवे, सचिन उंडे, ग्रामपंचायत सदस्य योगेश शिंदे, नवनाथ उंडे, लालासाहेब गोरे, बाबासाहेब फापाळे, विश्वास ससाने, हनुमंत जाधव, सुनील उंडे, पोपट कुरुमकर, दीपक वाबळे, हनुमंत वाबळे, नवनाथ शिंदे, लक्ष्मण मांडे, बबन धावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# भोकर : अध्यक्षपदी सुलोचना ढोले

**भोकर : (समर्थ गांवकरी)**



भोकर शहरात भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३६ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुलोचना ढोले यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी डॉ. मनोज गिमेकर, दिलीपराव व गौतम कसबे तर सचिवपदी एल. ए. हिरे यांची निवड करण्यात आली.

मंगळवार दि. १० मार्च २०२६ रोजी भोकर येथील शासकीय विश्रामगृहात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यशोदा महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत दि. १४ एप्रिल २०२६ रोजी शहरात भव्य मिरवणूक काढण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याचेही ठरविण्यात आले.

सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रथमच सुलोचना ढोले यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी डॉ. मनोज गिमेकर, दिलीपराव व गौतम कसबे, सचिवपदी एल. ए. हिरे, सहसचिव मुकुंद धोतरे, कोषाध्यक्ष दत्ता डोंगरे यांची निवड करण्यात आली. संघटक म्हणून साहेबराव मोरे, गौरव गोवंदे व विकास क्षिरसागर तर सल्लागार म्हणून भीमराव दुधारे व भीमशाहीर बाबुराव गाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्य म्हणून सुनील कांबळे, मिलिंद गायकवाड, राहुल कांबळे, यशोधरा येरेकर, प्रयागबाई हानवते, सुरेखा गजभारे, प्रेमिला कांबळे, राजेश चंद्रे, चांगुना लोखंडे व लक्ष्मणराव यांची निवड करण्यात आली. प्रसिद्धी प्रमुख म्हणून सुभाष तेले व सिद्धार्थ जाधव यांची निवड करण्यात आली. बैठकीत उपस्थितांनी नव्या कार्यकारिणीचे स्वागत करून पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

# धूमधडाक्यात सर्वधर्मिय सामूहिक विवाह सोहळा संपन्न



## नऊ जोडपी झाली विवाहबद्ध

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

पवार कुटुंबीयांच्यावतीने दि. १४ मार्च रोजी कंधार मध्ये सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात विविध जाती धर्मांचे नऊ जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. हा विवाह सोहळा दुपारी घोडज रोड वरील कै. शिवरामजी पवार मंगल कार्यालयात पार पडला.

समाजात ऐक्य, धर्मनिरपेक्षता आणि बचतीचा संदेश देण्यासाठी पवार कुटुंबीय गेल्या २५ वर्षांपासून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवत आहे. त्याच परंपरेत कै. शिवरामजी पवार यांच्या स्मृतीदिना निमित्त हा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या विवाह सोहळ्यासाठी नऊ जोडप्यांनी नोंदणी केली होती. पवार कुटुंबीयांच्यावतीने वधूंना मंगळसूत्र, वधू - वराना कपडे, इतर साहित्य मोफत देण्यात आले. विवाहासाठी मंगल कार्यालय, निवास आणि भोजनाची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आली होती. ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय पवार, प्राचार्य डॉ. विजय पवार व डॉ. राजेंद्र पवार यांनी या सोहळ्यासाठी पुढाकार घेतला होता. या सामूहिक विवाह सोहळ्यास माजी आमदार गुरुनाथ कुरुडे, माजी आमदार रोहिदास चव्हाण, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, जेष्ठ विधीज्ञ बी. के. पांचाळ, उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, बाबुराव केंद्रे, माधवराव पेठकर, भाजचे तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, उत्तम चव्हाण, माधव कांबळे, बाळासाहेब गर्जे यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. सोहळ्याला हजारो नागरिकांनी उपस्थित राहून नवविवाहित जोडप्यांना आशीर्वाद दिले.

# 'अँटी रॅगिंग' विषयावर कार्यशाळा संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात 'अँटी रॅगिंग : उपाय व वैशिष्ट्ये' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस प्रमुख पाहुण्या म्हणून ॲड. विजया घोडके उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी महिलांच्या कायद्यांबाबत मार्गदर्शन करताना रॅगिंग ॲक्टविषयी सविस्तर माहिती दिली. महिलांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तरुणपणात भावनांच्या आहारी न जाता विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयीन परिसरात कोणीही कोणाला त्रास देऊ नये व प्रत्येक विद्यार्थ्याने एकमेकांना सहकार्य करावे, असेही त्या म्हणाल्या.

# स्वतःवर प्रेम करणाऱ्या महिलाच कुटुंबावर प्रेम करू शकतात – डॉ. सौ. प्रतिभा पाचपुते

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

आजच्या धकाधकीच्या जीवनात महिला नोकरी व घर सांभाळताना कुटुंबातील सर्व सदस्यांची काळजी घेतात; मात्र या धावपळीत त्या अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे पुढे विविध आजारांना सामोरे जावे लागते. महिलांनी स्वतःसाठी वेळ काढून योग व प्राणायाम करणे, तसेच केमिकलमुक्त अन्न सेवन करणे गरजेचे आहे. आनंदी व निरोगी आयुष्य जगण्यासाठी महिलांनी आधी स्वतःवर प्रेम केले पाहिजे. स्त्री निरोगी असेल तरच ती कुटुंबाची योग्य काळजी घेऊ शकते. घरातील स्त्री आजारी पडली तर संपूर्ण घर आजारी असल्यासारखे वाटते, असे प्रतिपादन परिक्रमा संकुलाच्या अध्यक्षा तथा जिल्हा परिषद सदस्या डॉ. सौ. प्रतिभा पाचपुते यांनी केले.

नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त पंतनगर येथील कम्युनिटी हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पुढे बोलताना डॉ. पाचपुते म्हणाल्या की, महिला दिनानिमित्त नगरपरिषदेने विविध स्पर्धांचे आयोजन करून स्तुत्य उपक्रम राबविले आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी अशा कार्यक्रमांची गरज असल्याचे सांगत त्यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यातही महिलांसाठी विविध योजना राबविण्याच्या सूचना दिल्या. यावेळी नगराध्यक्ष सुनीताताई खेतमालिस यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी नगरपरिषदेच्या माध्यमातून महिलांसाठी विविध योजना राबविण्याचा व शहराच्या विकासासाठी महिलांकडून आलेल्या सूचनांचा विचार करून त्यांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करू, असे सांगितले.

उपनगराध्यक्ष सौ. अलकाताई अनुभुले यांनी महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत नगरपरिषदेच्या माध्यमातून महिलांचे प्रश्न सोडविण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सुमारे ८० महिलांनी या तपासणीचा लाभ घेतला. पाककला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक महिलांनी विविध पदार्थ तयार करून आणले होते. यामध्ये पूनम मेहेर, दिशा सावंत व योगिता परदेशी या विजेत्या ठरल्या.

विविध गुणदर्शन स्पर्धेत अमृता मोरे, मीना गोरे व आर्या पाटील यांनी अनुक्रमे पारितोषिके मिळविली.

शहराच्या विकासासाठी महिलांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांसाठी नगरपरिषदेने विशेष स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत २५ महिलांनी सहभाग नोंदवून आपल्या संकल्पना लेखी स्वरूपात 'सजेशन बॉक्स' मध्ये दिल्या. यात रेणुका सुहास कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक, सुनीता जंजिरे यांनी द्वितीय क्रमांक, तर दीपाली मोटे व शारदा जगताप यांनी तृतीय क्रमांक पटकाविला.

# सामान्य कुटुंबातील असामान्य कर्तृत्व – आयएएस ऋतुजा अशोकराव गायकवाड!

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



संगमनेर तालुक्यातील नान्नज दुमाला येथील कन्या ऋतुजा अशोकराव गायकवाड हिने आपल्या जिद्दी, मेहनती आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात १०६ वी रँक मिळवत आयएएस पदावर यश संपादन केले आहे. सामान्य कुटुंबातून आलेल्या ऋतुजाने कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या बळावर मोठे यश मिळवून तालुक्याचे तसेच जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

ऋतुजाचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नान्नज दुमाला येथे झाले. त्यानंतरचे माध्यमिक शिक्षण गावातीलच विद्यालयात पूर्ण झाले. शालेय जीवनात ती नेहमीच अभ्यासू, शिस्तप्रिय आणि मितभाषी विद्यार्थीनी म्हणून ओळखली जात होती. दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवत तिने यशाचा पहिला टप्पा गाठला. त्यानंतर बारावी विज्ञान शाखेतही तिने उत्कृष्ट गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. इंजिनिअरिंगसाठी नामांकित महाविद्यालयात प्रवेशाची संधी असतानाही प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न डोळ्यासमोर ठेवत ऋतुजाने राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात बी.टेक (कृषी) या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. याच काळात तिने संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू केली. तिच्या या प्रवासात आई-वडिलांनी दिलेली साथ आणि प्रोत्साहन मोलाचे ठरले. पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ऋतुजाने दिल्ली येथे जाऊन चार वर्षे अथक परिश्रम घेत संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी केली. अनेक अडचणींवर मात करत अखेर २०२६ साली तिने यश मिळवले आणि आयएएस पदावर आपले स्थान निश्चित केले. ऋतुजाचा हा प्रवास केवळ वैयक्तिक यशाचा नाही तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. मुलगी असल्याचे भांडवल न करता जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तिने हे यश मिळवले. तिचे साधे, नम्र व्यक्तिमत्त्व आणि समाजातील सर्वसामान्य घटकांच्या सेवेसाठी असलेला निर्धार हे तिच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ऋतुजाच्या यशामुळे तिच्या कुटुंबासह संपूर्ण संगमनेर तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्याला अभिमान वाटत आहे. विशेषतः तिच्या आई-वडिलांनी दाखवलेला संयम, विश्वास आणि त्याग यामुळेच हा यशस्वी प्रवास शक्य झाला. ऋतुजा अशोकराव गायकवाड हिचे हे यश प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या असंख्य तरुण-तरुणींना नक्कीच प्रेरणा देणारे आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी आणि समाजसेवेच्या कार्यासाठी सर्वत्रून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नागरिकांनी बीएलओना सहकार्य करावे

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २१८ शिर्डी विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीचा आगामी सखोल पुनरीक्षण कार्यक्रम लवकरच राबविण्यात येणार आहे. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात सर्वसामान्य मतदारांनी सक्रिय सहभाग घेऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना योग्य ती माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांनी केले आहे. शिर्डी मतदारसंघात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अनुषंगाने सध्या महत्त्वपूर्ण कार्यवाही सुरू आहे. याअंतर्गत २०२४ च्या मतदार यादीतील व यापूर्वी झालेल्या २००२ च्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अंतिम मतदार यादीतील 'कॉमन' मतदारांची, रक्ताच्या नात्यातील वंशज (मुलगा/मुलगी, नातू/नात) यांचे वारस पडताळणी करण्याचे कामकाज हाती घेण्यात आले आहे.

# वलसाड-डांगमध्ये कुपोषणाचा विळखा

## वासदा आमदार अनंत पटेल यांचे सरकारला प्रश्न

**डांग-गुजरात : (समर्थ गांवकरी)**

गुजरात विधानसभेच्या सुरू असलेल्या बजेट अधिवेशनात राज्यातील कुपोषणाच्या प्रश्नावर विरोधकांनी सरकारला घेरले. विशेषतः दक्षिण गुजरातमधील आदिवासीबहुल वलसाड आणि डांग जिल्हा येथे कुपोषित मुलांची संख्या चिंताजनक असल्याचे आकडे समोर आले आहेत.विधानसभेत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, ३१जानेवारी २०२६ पर्यंत डांग आणि वलसाड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये कुपोषणाचा प्रश्न गंभीर असल्याचे दिसून आले आहे. डांग जिल्ह्यात एकूण ३२२० मुले कुपोषणाने ग्रस्त असल्याची नोंद आहे, तर वलसाड जिल्ह्यात ७४८७ मुले कुपोषित असल्याचे समोर आले आहे.डांग जिल्ह्यातील तालुकानिहाय आकडेवारीनुसार, आहवा येथे १६४८ सुबिर येथे ९५७, तर वघई येथे ६५ कुपोषित मुलांची नोंद झाली आहे. अनंत पटेल यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करत सांगितले की आदिवासी भागांमध्ये कुपोषणाची समस्या अजूनही गंभीर आहे आणि सरकारकडून करण्यात येणारी उपाययोजना अपुरी पडत आहे. ग्रामीण भागातील मुलांना पुरेसा पौष्टिक आहार मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. दुसरीकडे, महिला व बालविकास विभागाने सांगितले की कुपोषण निर्मूलनासाठी सरकार ठोस प्रयत्न करत आहे. मागील एका वर्षात वलसाड जिल्हा मध्ये १०,२८९ आणि डांग जिल्हा मध्ये १८८०मुले कुपोषणातून मुक्त झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये मुलांना फोर्टिफाईड पोषण आहार दिला जात असून, बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी जन्मापूर्वीपासून ते जन्मानंतरच्या पहिल्या १००० दिवसांपर्यंत विशेष पोषण कार्यक्रम राबवले जात आहेत. तसेच अंगणवाडी सेविकांकडून नियमित निरीक्षण केले जात असल्याचेही सांगण्यात आले.तरीही कपराडा व धरमपूर तसेच आहवा -सुबिर सारख्या दुर्गम भागांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याने सामाजिक संस्था आणि विरोधकांकडून या प्रश्नावर अधिक ठोस उपाययोजनांची मागणी केली जात आहे.

# युवकाच्या खून प्रकरणी तिघांना जन्मठेप; १० हजार रुपये दंड

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील आंदेगाववाडी भोजुतांडा परिसरात झालेल्या युवकाच्या खून प्रकरणात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने तीन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच तिन्ही आरोपींस प्रत्येकी १० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या प्रकरणातील फिर्यादी रमेश गोविंद राठोड (रा. आंदेगाववाडी, भोजूतांडा, ता. मुखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १० ऑक्टोबर २०२३ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मोठा मुलगा विनोद राठोड हा घरासमोर बाजेवर झोपला असता. त्यावेळी चारही आरोपी तेथे येऊन गोंधळ घालू लागले. त्यावेळी आरोपी पिंटू उर्फ अंकुश बळीराम राठोड याने विनोदच्या अंगावर मिरचीची पूड फेकली. काशाबाई धोंडिबा राठोड हिने विनोदचे हात पकडून धरले, तर धोंडिबा देवला राठोड याने विनोदच्या छातीवर चाकूने वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या विनोद राठोड याला तातडीने देगलूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी मुखेड पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. २०४/२०२३ अंतर्गत भादंवी कलम ३०२, ३२३, ३२४, ५०६ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक जी. एच. कागणे यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयात सुनावणीदरम्यान एकूण १५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. साक्षीदारांचे जबाब आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद लक्षात घेऊन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. पी. देशमुख यांनी १३ मार्च रोजी निकाल दिला आहे.

# विशाल छुगेरा प्रॉपर्टीजतर्फे चॅनेल पार्टनर्स संमेलनाचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



एन. ए. प्लॉटिंग क्षेत्रातील अग्रणी विशाल छुगेरा (व्ही. सी. प्रॉपर्टीज) पुढाकाराने विमाननगर येथील हॉटेल ग्रँड हयात येथे आयोजित चॅनेल पार्टनर्स संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे आणि परिसरात रिअल इस्टेट क्षेत्रात काम करणाऱ्या जवळपास ६०० व्यावसायिकांनी संमेलनाला हजेरी लावत व्ही. सी. प्रॉपर्टीजच्या बंगलो प्रकल्पांविषयी जाणून घेतले. कंपनीच्या आगामी प्रकल्पांची संकल्पना, त्यामागील नियोजन, तसेच ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि गुंतवणुकीच्या संधी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. व्ही. सी. प्रॉपर्टीजचे चेअरमन विशाल छुगेरा, संचालक अमन छुगेरा व क्रिश छुगेरा, मार्गदर्शक व सल्लागार दर्शन चावला आणि किशन मिलानी उपस्थित होते. विशाल छुगेरा म्हणाले, "रिअल इस्टेट क्षेत्रात विश्वास, पारदर्शकता आणि गुणवत्तेला सर्वाधिक महत्त्व आहे. ग्राहकांच्या अपेक्षा ओळखून त्यानुसार नियोजनबद्ध प्रकल्प उभारणे ही आमची प्राथमिकता आहे. एन.ए. प्लॉटिंग आणि बंगलो प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही गुंतवणूकदार आणि घर खरेदीदारांना सुरक्षित व दीर्घकालीन मूल्य देण्याचा प्रयत्न करत आहोत. पुणे आणि आसपासच्या परिसरात वाढत्या नागरीकरणामुळे स्वतंत्र घर, बंगलो प्रकल्प आणि प्लॉटिंगला मोठी मागणी निर्माण होत आहे. नियोजनबद्ध पायाभूत सुविधा, उत्तम कनेक्टिव्हिटी आणि नैसर्गिक वातावरणाचा समतोल राखत प्रकल्प विकसित करण्यावर कंपनीचा भर आहे. 'जमीन विकत घ्या, देव आता ती बनवत नाही' प्रॉपर्टीजचा असा नारा आहे."

"व्ही. सी. प्रॉपर्टीज गेल्या २१ वर्षांपासून एन. ए. प्लॉटिंग आणि बंगलो प्रकल्पांमध्ये कार्यरत असून, प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी आमच्या ब्रँड अँबेसेडर आहेत. आजवर १५ पेक्षा अधिक प्रकल्पातून, २५०० हुन अधिक समाधानी ग्राहकांना लाखो स्क्वेअर फूट जमीन आम्ही विकली आहे. पुण्यापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या केसनंद येथे निवान मेडोस हा ८० एकरात, तर बकोरी येथे निवान ग्रुँड्यअर २५ एकरात असे दोन बंगलो प्रकल्प आहेत. चॅनेल किंवा ग्रोथ पार्टनर्स आमच्या व्यवसायाचा कणा असून, या प्रकल्पांतून त्यांना उत्तम व्यवसाय मिळावा, गुंतवणूकदारांना लाभ व्हावा, ज्यांना आपले पहिले घर बंगला व्हावे, असे वाटते, त्यांना ही संधी देण्याचा आमचा प्रयत्न आहे." या संमेलनाच्या माध्यमातून चॅनेल पार्टनर्सना कंपनीच्या विविध प्रकल्पांची माहिती देण्याबरोबरच त्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध झाली. कार्यक्रमादरम्यान रिअल इस्टेट क्षेत्रातील बदलते ट्रेंड, गुंतवणुकीच्या संधी आणि ग्राहकांच्या अपेक्षा यावरही चर्चा करण्यात आली. संमेलनाच्या शेवटी उपस्थित चॅनेल पार्टनर्सशी संवाद साधत कंपनीच्या आगामी योजनांविषयी माहिती देण्यात आली. सहभागी व्यावसायिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यात अशा प्रकारच्या संमेलनांमुळे उद्योगातील सहकार्य आणि संवाद अधिक दृढ होण्यास मदत होईल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

# उद्योजक आनंद जगदाळे यांच्याकडून लाखोंची मदत

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

आढळगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाला आढळगावचे भूमिपुत्र व पुण्यातील नामवंत उद्योजक, आयप्लॅनेट क्लाऊड सोल्युशन्स प्रा. लि. कंपनीचे सर्वेसर्वा आदरणीय आनंदजी जगदाळे यांच्या वतीने साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली.



आढळगाव ग्रामपंचायतीचे सरपंच शिवप्रसाद उबाळे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकास समितीची बैठक सुरू होती. या बैठकीला अनेक सदस्य उपस्थित होते. विद्यालयातील शिक्षक बापू काळे सर व शेळके सर यांनी बैठकीत विद्यालयाला साऊंड सिस्टिमची अत्यंत गरज असल्याचे सांगून ती उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना केली.

यानंतर सरपंच शिवप्रसाद उबाळे यांनी पुढाकार घेत आढळगावचे भूषण व उद्योजक आनंदजी जगदाळे यांना दूरध्वनीद्वारे विद्यालयासाठी साऊंड सिस्टिम देण्याची विनंती केली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत जगदाळे यांनी तात्काळ कोटेशन पाठविण्यास सांगितले. विद्यालयाकडून कोटेशन पाठविल्यानंतर अवघ्या आठ दिवसांत त्यांनी साऊंड सिस्टिमचे साहित्य आढळगाव विद्यालयात पोहोचवले. त्यांनी केलेले हे सहकार्य समाजासाठी प्रेरणादायी व दिशादर्शक असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. साऊंड सिस्टिमचे वितरण आढळगाव ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच शिवप्रसाद उबाळे, पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव भैलूमे, माजी सरपंच नानासाहेब बोळगे, सोसायटीचे माजी चेअरमन दत्ताभाऊ चव्हाण, शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष रघुनाथजी सूर्यवंशी, संचालक ज्ञानदेव गाढवे, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत डोके, पत्रकार अमोल गव्हाणे, सत्यवान शिंदे, जावेद इनामदार, सागर वाकडे, चक्रधर गव्हाणे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य राम भालेराव आदी मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाचे प्राचार्य गदादे सर यांच्याकडे करण्यात आले.

यावेळी प्राचार्य गदादे सर, सरपंच शिवप्रसाद उबाळे व माजी सरपंच नानासाहेब बोळगे यांनी उद्योजक आनंदजी जगदाळे यांचे मनापासून आभार मानले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू काळे सर यांनी केले, तर आभार शेळके व्ही. के. सर यांनी मानले.

कोरोना काळात आनंदजी जगदाळे यांनी आढळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला सुमारे एक लाख रुपये किमतीचे इन्व्हर्टर व बॅटऱ्या दिल्या होत्या. तसेच गेल्या उन्हाळ्यात आढळगाव ग्रामपंचायतीला पाणीपुरवठ्याची अडचण निर्माण झाल्यावर त्यांनी तातडीने दोन बोरवेल करून दिल्या होत्या. आढळगावच्या विकासात व समाजकार्यात आनंदजी जगदाळे यांचे मोठे योगदान असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# जिल्हास्तरीय प्रदर्शनात कन्या विद्यालय प्रथम

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने जिल्हास्तरीय अटल प्रदर्शनात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी "Empowering Teachers to Become ATL Transformation Agent" या उपक्रमांतर्गत गणित, विज्ञान व भाषा विषयांच्या शिक्षकांना सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये प्रत्येक विषयासाठी तीन दिवसांचे सत्र आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाअंतर्गत १० मार्च रोजी अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय शिक्षक-विद्यार्थी अटल प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनातील मेकॅनिकल विभागात श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा येथील श्रीमती गीतांजली राऊत-कदम यांनी तयार केलेल्या Self Watering System या उपकरणाला प्रथम क्रमांक मिळाला. इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी कु. मयुरी गांगर्डे हिने या प्रकल्पाचे उत्कृष्ट सादरीकरण केले. या प्रकल्पासाठी तिला श्रीमती गीतांजली राऊत-कदम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. रेणावीकर विद्यालय, अहिल्यानगर येथे आयोजित या प्रदर्शनात अटल लॅब असलेल्या शाळांचे शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. अहिल्यानगर व सोनई क्लस्टरमधील एकूण ४६ शाळांनी सहभाग नोंदवला होता. प्रत्येक शाळेकडून चार प्रकल्प सादर करण्यात आले होते. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तसेच स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष व सदस्य श्री. कुंडलिकराव दरेकर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य श्री. बाबासाहेब भोस, विभागीय अधिकारी श्री. नवनाथ बोडखे, मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे, पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे, गुरुकुल प्रकल्प प्रमुख श्री. किरण शिंदे तसेच परिसरातील मान्यवरांनी शिक्षक व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.



# 'लक्ष्मी निवास' मध्ये राजच्या प्रेमाचा आक्रमक पैलू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

झी टीव्हीवरील कौटुंबिक मालिका 'लक्ष्मी निवास' आपल्या भावनिक कथाकथन आणि अनेक स्तर असलेल्या पात्रांमुळे प्रेक्षकांचे सातत्याने मनोरंजन करत आहे. मध्यमवर्गीय कुटुंबाची स्वप्ने आणि नातेसंबंधांभोवती फिरणारी ही कथा असून प्रियोम देव गुज्जर यात राज बुंदेला हा पात्र साकारत असून तो विशेष लक्ष वेधून घेत आहे. अभिनेत्री रिया मुंजाल साकारत असलेल्या भूमिकाचा मोहक आणि परिपूर्ण जोडीदार म्हणून तो प्रेक्षकांमध्ये खास लोकप्रिय झाला आहे. शांत स्वभावाचा आणि मनापासून दुसऱ्यांची काळजी घेणारा असा श्रीमंत उद्योजक म्हणून ओळख करून देण्यात आलेला राज आतापर्यंत प्रेक्षकांना एक आदर्श, पूर्णपणे "ग्रीन फ्लॅग" वाटत होता, ज्याचे भूमिकावर मनापासून प्रेम आहे आणि तिला आनंदी ठेवण्यासाठी काहीही करणारा असा आहे. मात्र, कथानक जसजसे पुढे सरकत आहे तसतसा प्रेक्षकांना राजच्या स्वभावातही एक अनपेक्षित बदल दिसू लागतो. सुरुवातीला ज्याला निरागस आणि शुद्ध प्रेम समजले जात होते, त्याच प्रेमात आता हळूहळू आसक्ती आणि मालकी हक्काची छटा जाणवू लागली आहे.



यामुळे कथेला नाट्यमय वळण मिळाले असून राजच्या व्यक्तिरेखेतील एक नवीन स्तर उलगडायला सुरुवात होत आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, प्रियोमने सांगितले की अलीकडेच त्याने चित्रीत केलेले गहन असे झुरळाचे दृश्य त्याने 'लक्ष्मी निवास'च्या ऑडिशनदरम्यान सादर केले होते. त्या क्षणाबद्दल बोलताना प्रियोम म्हणाला, "मजेशीर गोष्ट अशी आहे की मी हल्लीच या मालिकेसाठी चित्रीत केलेले हेच दृश्य मी 'लक्ष्मी निवास'च्या ऑडिशनमध्येही सादर केले होते. हे दृश्य जेव्हा मी प्रथम वाचले होते तेव्हा ते किती तीव्र आणि वेगळे आहे हे पाहून मला खूप आश्चर्य वाटले होते. या दृश्यात राजला भूमिकाच्या अंगावर एक झुरळ दिसते आणि तो अतिशय टोकाची प्रतिक्रिया देतो. तो ते मारतो आणि तिला काहीही इजा होऊ नये म्हणून ते खाऊही टाकतो. हे ऐकायला विचित्र वाटू शकतं, पण या क्षणातून राजच्या प्रेमातील आसक्ती, अनपेक्षितपणा आणि त्याची मर्यादा ओलांडण्याची प्रवृत्ती स्पष्ट दिसते.

# द्रोण लगडचे उल्लेखनीय यश

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

व्यंकनाथ विद्यालयाचा माजी विद्यार्थी द्रोण पुरुषोत्तम लगड याने देशातील प्रतिष्ठित अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा असलेल्या जेईई (JEE) मेन्स परीक्षेत ९८.६६ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना द्रोण लगड याने सांगितले की, विद्यालयातील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद यामुळेच हे यश मिळवणे शक्य झाले. विद्यालयात शिकत असतानाच मूलभूत संकल्पना स्पष्टपणे समजावून दिल्यामुळे परीक्षेची तयारी सोपी झाली, असेही त्याने नमूद केले. द्रोणचे वडील पुरुषोत्तम लगड हे देखील विद्यालयाच्या स्कूल कमिटीमध्ये कार्यरत असून विद्यार्थी हिताच्या दृष्टीने सातत्याने कार्य करत असतात.

# मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहरेच्या उपस्थितीत ऑडिशन संपन्न

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्मृती एंटरप्राईझेसच्या वतीने आयोजित 'द ज्वेल वन पेजेंट – मिस अँड मिसेस महाराष्ट्र 2026' या राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स आज सॅफ्रॉन बॅन्क्वेट्स येथे उत्साहात पार पडल्या. या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी सहभागी महिलांशी संवाद साधत त्यांना आत्मविश्वासाने आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रेरित केले.



कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीच्या अध्यक्षा स्वातीताई पोकळे,स्मृती एंटरप्राईझेसच्या संचालिका स्मृती बोनगे, संचालक आधार शिंदे उपस्थित होते. आयोजकांनी स्पर्धेच्या संकल्पनेविषयी माहिती देत महिलांना व्यक्तिमत्त्व विकास, फॅशन, मॉडेलिंग आणि मनोरंजन क्षेत्रात पुढे जाण्याच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे सांगितले.

या स्पर्धेत 18 ते 55 वयोगटातील विवाहित आणि अविवाहित महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. पुणे ऑडिशन्समध्ये ८० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदवत आपली कला आणि व्यक्तिमत्त्व सादर केले. निवड झालेल्या स्पर्धकांना पुढील फेरीसाठी पात्र ठरवण्यात आले.

महाराष्ट्रभरातील महिलांना आपली प्रतिभा, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व सादर करण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आल्याची भावना अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांनी व्यक्त केली आणि स्पर्धकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छ दिल्या.

स्पर्धेच्या अंतिम फेरीत विजेत्यांना एकूण 12 लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत. तसेच अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या 40 स्पर्धकांना स्मृती एंटरप्राईझेस आणि पेंटेन स्टुडियोज प्रस्तुत 'जयोस्तुते' या म्युझिक अल्बममध्ये काम करण्याची संधी दिली जाणार आहे. महाराष्ट्रातील विविध सहा शहरांमध्ये पुढील ऑडिशन्स आयोजित करण्यात येणार असून त्यातून निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये भव्य ग्रँड फिनाले मुंबई मध्ये पार पडणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

स्पर्धेचे परीक्षण अश्मीक कामठे, जयेश पाटील, सोपान शेडगे, सौम्या नायर, केतन आरमरकर, जयश्री एम यांनी केले तर सूत्रसंचालन कोमल, तनुजा यांनी केले.

# फ्लिपकार्टने वाढवली स्मार्ट कुलिंग उत्पादन श्रेणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

फ्लिपकार्ट इंडिया या होमग्रोन ई कॉमर्स मार्केटप्लेस तर्फे आज त्यांच्या मंचावरुन आता मोटोरोला एअरकंडिशनर्सची श्रृंखला उपलब्ध करुन देत असल्याची घोषणा करण्यात आली, या मंचावरुन आता नवीन एअर कंडिशनिंगची श्रेणी उपलब्ध होणार असून यांत कोणत्याही प्रकारचे जोडणी शुल्क किंवा खरेदी नंतरच्या उपकरणांची खरेदीचा त्रास ग्राहकांना होणार नाही. ही नवी श्रृंखला सर्वसमावेशक अशा खर्चासहीत रु.२८९९०/- या सुरुवातीच्या किंमतीपासून उपलबध्द होणार आहे. भारतीय ग्राहक हे अगदी सखोलपणे टनेज आणि एनर्जी रेटिंगचा अभ्यास करुन एअर कंडिशनर्सची खरेदी करत असताना दुसरीकडे त्यांना खरेदी केल्यानंतरचे विविध खर्च करावे लागतात ज्यामुळे खर्चाचा आकडा वाढतो. मोटोरोला एअरकंडिशनरची श्रृंखला या आव्हानाचा मुकाबला अतिशय पारदर्शक आणि सर्वसमावेशक अशा किंमतीच्या मॉडेलने करत असून यामध्ये जोडणी आणि गरजेच्या सर्व वस्तू उपलब्ध असतील. व्यावसायिक पध्दतीची जोडणी करण्यासह उच्च दर्जाची कॉपर पाईपिंग, वॉल माऊंट स्टॅन्ड आणि तीन वर्षांची गॅस फिलिंग ॲश्युरन्स ही आता एकाच किंमतीत उपलब्ध असल्याने ग्राहकांना या उकाड्यात चिंतामुक्त आणि पारदर्शक व्यवहार करणे शक्य होणार आहे. फ्लिपकार्टच्या लार्ज ॲप्लायन्सेस चे व्हाईस प्रेसिडेंट राकेश कृष्णन यांनी सांगितले " भारतीय घरांमध्ये एअर कंडिशनर्स हे उत्पादन सर्वाधिक संशोधन केल्या नंतर विचारपूर्वक निर्णय घेऊन खरेदी केले जाते, विशेषकरुन त्यांना उन्हाळ्यापूर्वी अधिक मागणी असते. पण अनेकवेळा नवीन खरेदीचा आनंद हा अचानक उद्भवणाऱ्या इन्स्टॉलेशन फी मुळे मावळतो. नवीन मोटोरोलाच्या या एसी रेंज आणि त्यांच्या झिरो हिडन कॉस्ट मॉडेल मुळे आम्ही हा अंतिम अडथळा दूर करुन खरोखरचा आनंददायी अनुभव देऊ करतो. त्याच बरोबर या सुरुवाती मुळे प्रिमियम तंत्रज्ञानाच्या उत्पादनांचे लोकशाहीकरण करण्याची आमची वचनबध्दता वाढवून आमच्या वैविध्यपूर्ण उत्पादन श्रृंखलेसह मुल्यावर्धित सेवांची पध्दती देऊन ग्राहकांचा एकूण आत्मविश्वास वाढवत आहोत." इंडिया एमबीजी चे व्यवस्थापकीय संचालक टी एम नरसिंम्हन यांनी सांगितले " मोटोरोला ने जागतिक स्तरावर आपले नाव हे सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञानाने युक्त उत्पादने गुणवत्ता, विश्वसनीयता आणि नाविन्याने युक्त देणारी म्हणून कमावले आहे. आंम्हाला अभिमान वाटतो की आमची ही परंपरा आता आम्ही भारतात घरगुती उत्पादनांच्या श्रेणीतही वाढवत आहोत. फ्लिपकार्ट बरोबरच्या भागीदारी मुळे आम्ही फक्त उच्च क्षमतेची कुलिंग उत्पादनेच सुरु करत नाही तर आम्ही प्रथमच किंमतीसह सेवांसाठी पारदर्शक दृष्टिकोन देऊन आमच्यावरील ग्राहकांचा विश्वास दृढ करत आहोत."




# जन्मजात हृदय दोष असलेल्या नवजात बाळाला दिले नवीन जीवन

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल मुंबई ने एका जटिल कार्डियाक हस्तक्षेप प्रक्रियेद्वारे - पीडीए (पेटंट डक्टस आर्टेरिओसस) स्टेंटिंगद्वारे गंभीर जन्मजात नलिकांवर अवलंबून असलेल्या हृदय दोष असलेल्या पाच दिवसांच्या नवजात बाळाचे प्राण यशस्वीरित्या वाचवले. त्वचेचा तीव्र निळसरपणा (सायनोसिस) च्या तक्रारींसह नवजात बाळाला महाराष्ट्रातील एका लहान शहरातील बालरोगतज्ज्ञांकडे आणण्यात आले. चाचण्यांमध्ये केवळ ६५ टक्के धोकादायकपणे कमी ऑक्सिजन संपृक्तता आढळून आली. फुफ्फुसांना पुरेसा रक्तपुरवठा होत नसलेल्या गंभीर सायनोटिक जन्मजात हृदयरोगाचा संशय असल्याने, स्थानिक डॉक्टरांनी ताबडतोब मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमधील तज्ज्ञांशी संपर्क साधला.

# शिल्पा शिंदे लखनौमध्ये ठरल्या 'सेल्फी क्वीन'

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०' मधील अंगूरी भाबीच्या भूमिकेमुळे घराघरात पोहोचलेल्या अभिनेत्री शिल्पा शिंदे यांनी नुकत्याच लखनौ भेटीदरम्यान चाहत्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांना आनंदित केले. आपल्या उत्साही स्वभावामुळे ओळखल्या जाणाऱ्या शिल्पाने चाहत्यांसोबत गप्पागोष्टी करत वेळ घालवला आणि तब्बल १०० हून अधिक चाहत्यांसोबत सेल्फी काढल्या. त्यामुळे या भेटीचा प्रत्येक क्षण चाहत्यांसाठी संस्मरणीय ठरला. अंगूरी भाबीला प्रत्यक्ष भेटण्याचा आनंद आणि तिच्यासोबत सेल्फी घेण्याची संधी मिळाल्याने चाहत्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. या संवादामुळे लखनौमधील चाहत्यांशी अभिनेत्रीचा खास भावनिक बंध तयार झाल्याचे दिसून आले. आपला अनुभव सांगताना शिल्पा शिंदे म्हणाल्या, "आपण अनेकदा मित्र-मैत्रिणी किंवा कुटुंबासोबत सेल्फी काढतो, पण चाहत्यांसोबत सेल्फी काढणे हा पूर्णपणे वेगळा आणि खास अनुभव असतो. लखनौमध्ये येण्याची आणि आमच्या मालिकेवर प्रेम करणाऱ्या इतक्या सुंदर लोकांना भेटण्याची संधी दिल्याबद्दल मी एण्ड टीव्हीची आभारी आहे. चाहत्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहून मी भारावून गेले. या सुंदर शहरात चाहत्यांशी गप्पा मारत त्यांच्यासोबत सेल्फी काढण्याचे क्षण माझ्यासाठी खूप खास आणि संस्मरणीय आहेत." 'भाबीजी घर पर है २.०' ही मालिका दर सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता एण्ड टीव्हीवर प्रेक्षकांच्या भेटीला येते. तसेच मालिकेचे सर्व भाग झी5 वरही कधीही पाहता येतात.



# टाटा मोटर्सला देशभरातून ५,०००हून अधिक बसेसची ऑर्डर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारतामधील सर्वात मोठी व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनी टाटा मोटर्सला देशभरातील विविध राज्य परिवहन उपक्रमांकडून (एसटीयू) ५,०००हून अधिक बसेस आणि बस चेसिसच्या ऑर्डर्स मिळाल्या आहेत. या ऑर्डर्समुळे भारतातील सार्वजनिक परिवहन क्षेत्रात कंपनीचे स्थान अधिक मजबूत झाले असून देशातील पुढील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळणार आहे. सरकारच्या खरेदी यंत्रणेअंतर्गत स्पर्धात्मक ई-बोली प्रक्रियेच्या माध्यमातून या निविदा मिळाल्या असून संबंधित राज्य परिवहन संस्थांसोबतच्या करारानुसार या बसेसची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. टाटा मोटर्स अनेक दशकांपासून सार्वजनिक परिवहन क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.



एमएसआरटीसी (महाराष्ट्र), जीएसआरटीसी (गुजरात), एनडब्ल्यूकेआरटीसी (कर्नाटक), टीजीएसआरटीसी (तेलंगणा), बीएसआरटीसी (बिहार), आरएसआरटीसी (राजस्थान), केएसआरटीसी (केरळ), हरियाणा रोडवेज आणि चंदीगड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग यांसारख्या संस्थांकडून या ऑर्डर्स मिळाल्या आहेत. या संदर्भात टाटा मोटर्सच्या कमर्शियल पॅसेंजर व्हेईकल व्यवसायाचे उपाध्यक्ष व प्रमुख आनंद एस. म्हणाले, "विविध राज्य परिवहन उपक्रमांकडून मिळालेल्या या ऑर्डर्समुळे टाटा मोटर्सच्या गतीशीलता सोल्युशन्सवर असलेला विश्वास अधोरेखित होतो.

# पत्रकारिता आणि समाजसेवेतून जीवनदृष्टी विकसित होते

## महिला दिनानिमित्त विश्व संवाद केंद्रात चर्चासत्र

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

पत्रकारिता किंवा सामाजिक कार्याकडे केवळ 'पॅशन' म्हणून नाही, तर 'प्रोफेशन' म्हणून पाहावे असे सांगितले जाते. मात्र या दोन्ही क्षेत्रांत काम करताना केवळ व्यवसायिक अनुभवच नव्हे, तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टीही विकसित होते, असा सूर विश्व संवाद केंद्राच्या वतीने आयोजित 'कर्तृत्ववान ती' या कार्यक्रमात उमटला. जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर विश्व संवाद केंद्र पुणे फाउंडेशनतर्फे महिला माध्यमकर्मींसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार स्वाती राजे, कल्याणी सरदेसाई, ईशान्य भारतात कार्यरत सेवाव्रती अलका वैद्य आणि वीणा बेडेकर यांच्याशी संवाद साधण्यात आला. श्रुती मेहता आणि विश्व संवाद केंद्राच्या संपादक अंजली तागडे यांनी मान्यवरांना बोलते केले. स्वाती राजे म्हणाल्या, "१९८७ मध्ये मी पत्रकारितेला सुरुवात केली. त्याकाळी पूर्णवेळ वार्तांकन करणारी कदाचित मी पहिली महिला पत्रकार असावी. वार्ताहर म्हणून मला १४ वर्षे 'बायलाईन' मिळाली नाही, तरी प्रत्येक बातमीमधून मी समृद्ध होत गेले. पुढील प्रवासात संपादकीय दृष्टिकोन महत्त्वाचा ठरला." तसेच कोणतीही भाषा शाळांमधूनच लोप पावत असते, त्यामुळे शाळांमध्ये भाषेबाबत प्रबोधन करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.




कल्याणी सरदेसाई यांनी राष्ट्राच्या योजनांमध्ये मुलांना पुरेसे प्राधान्य दिले जात नसल्याची खंत व्यक्त केली. त्या म्हणाल्या, "मुले ही 'व्होट बँक' नसल्याने धोरणकर्त्यांकडून त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. आजही मुलांचे प्रश्न आपल्या प्राधान्यक्रमात नाहीत. आश्चर्याची बाब म्हणजे आपल्या परंपरेत रामायण-महाभारततही दत्तक मुलांच्या हक्कांविषयी जागरूकता दिसते." ईशान्य भारतात राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करणाऱ्या वीणा बेडेकर यांनी त्यांच्या कार्याचे अनुभव सांगितले. त्यांनी सांगितले की, पूर्व सीमा विकास परिषदेच्या माध्यमातून मणिपूरमध्ये स्थानिक गरज लक्षात घेऊन विविध शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. अलका वैद्य म्हणाल्या, "आम्ही काम सुरू केले तेव्हा मणिपूरच्या काही भागात स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन 'काळा दिवस' म्हणून पाळला जात होता. शाळांच्या माध्यमातून आम्ही तिथल्या जनजातींमध्ये शिक्षणाची ज्योत तेवत ठेवली आहे. राष्ट्रगीत आणि पसायदानही त्यांना शिकवले. त्यांना आपली नाही, तर आपल्याला पूर्वांचलाची गरज आहे." मणिपूरमधील आव्हानात्मक परिस्थितीत शिक्षक प्रशिक्षण वर्ग घेतानाचे अनुभवही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वातंत्र्यलढ्यातील अनेक वीरांगनांच्या त्यागाची आठवण करून देणारे 'भारतकन्या' हे प्रार्थनापर गीत सादर करण्यात आले. विश्व संवाद केंद्राचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले, तर सम्राट कदम यांनी आभार मानले.

# नोबल हॉस्पिटलमध्ये लठ्ठपणा व चयापचय रोगांसाठी उत्कृष्टता केंद्र सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटर येथे लठ्ठपणा, चयापचय रोग आणि प्रगत बेरियाट्रिक सायन्सेससाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चे उद्घाटन करण्यात आले. पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी नोबल हॉस्पिटल्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप माने, उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने, समूह कार्यकारी अधिकारी डॉ. संजय पठारे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



लठ्ठपणा हा केवळ जीवनशैलीशी संबंधित प्रश्न नसून आता त्याला वैद्यकीय स्थिती म्हणून मान्यता मिळाली आहे. आंतरराष्ट्रीय वैद्यकीय कोडिंग प्रणाली (ICD) मध्ये लठ्ठपणाचा आजार म्हणून समावेश झाल्याने त्यावर शास्त्रीय पद्धतीने उपचार करण्याचे महत्त्व वाढले आहे.

पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले की, असंसर्गजन्य आजारांबाबत (NCD) समाजात जागरूकतेचा अभाव आहे. लवकर निदान आणि योग्य उपचार यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून लठ्ठपणाच्या मुळाशी जाऊन उपचार करणारे हे केंद्र स्तुत्य पाऊल असल्याचे त्यांनी नमूद केले.

हे केंद्र प्रौढ तसेच लहान मुलांमधील लठ्ठपणाच्या उपचारासाठी बहुविद्याशाखीय दृष्टीकोनातून काम करणार आहे. रुग्णांना डॉक्टर, शल्यचिकित्सक, मानसोपचारतज्ज्ञ आणि इतर तज्ञांच्या टीमकडून मार्गदर्शन मिळणार आहे. या केंद्रात बेरियाट्रिक सर्जन, प्लास्टिक सर्जन, पोषणतज्ज्ञ, फिजिओथेरपिस्ट, समुपदेशक आणि ओबेसिटी एज्युकेटर्स यांचा समावेश असलेली विशेष टीम कार्यरत आहे. तसेच बॉडी कंपोझिशन अॅनालिसिस, डेक्सा स्कॅन, आधुनिक बेरियाट्रिक शस्त्रक्रिया, रोबोटिक्स आधारित सर्जरी आणि अॅल्युरियन गॅस्ट्रिक बलूनसारख्या विना शस्त्रक्रिया उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

लठ्ठपणा उपचारानंतर शरीरावरील अतिरिक्त त्वचा आणि चरबी कमी करण्यासाठी प्लास्टिक सर्जरी तसेच इतर उपचारही एकाच ठिकाणी उपलब्ध असतील. रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी प्रगत बेरियाट्रिक ऑपरेटिंग टेबलची सुविधाही येथे आहे.

तज्ज्ञांची बहुविद्याशाखीय टीम

या केंद्रात डॉ. रीमा काशिवा, डॉ. परमेश्वर बांब्रुले, डॉ. रवी स्वामीनाथन, डॉ. सारिका सातव, डॉ. अक्षय पवार, डॉ. रेश्मा कांगुडे, डॉ. भूपेंद्र गुप्ता, डॉ. सुहास खैरे आणि डॉ. शीतल हरपळे यांसारखे तज्ज्ञ कार्यरत आहेत.

केंद्राच्या संचालिका डॉ. रीमा काशिवा यांनी सांगितले की, लठ्ठपणावर वेळेत उपचार न केल्यास मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि इतर चयापचय विकारांचा धोका वाढतो. योग्य वेळी निदान आणि वैज्ञानिक उपचार केल्यास या गुंतागुंती टाळता येतात आणि रुग्णांचे जीवनमान सुधारते.

तज्ज्ञांच्या मते, लठ्ठपणाच्या गुंतागुंतींवर उपचार करण्यापेक्षा लठ्ठपणाच्या मुळाशी जाऊन त्यावर उपचार करणे अधिक महत्त्वाचे आहे. बीएमआय ३० पेक्षा जास्त असलेल्या व्यक्तींनी किंवा सहव्याधी असलेल्या २७ पेक्षा जास्त बीएमआय असलेल्या व्यक्तींनी वेळेत वैद्यकीय सल्ला घ्यावा.

नोबल हॉस्पिटल्सचे समूह कार्यकारी अधिकारी डॉ. संजय पठारे यांनी सांगितले की, चुकीच्या आहारपद्धती, बैठी जीवनशैली आणि ताणतणावामुळे प्रौढांसह मुलांमध्येही लठ्ठपणा वाढताना दिसत आहे. योग्य व्यवस्थापन केल्यास भविष्यातील अनेक गंभीर आजारांचा धोका कमी करता येतो.

उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने यांनी सांगितले की, प्रत्येक लठ्ठ व्यक्तीला शस्त्रक्रियेची गरज असतेच असे नाही. केंद्रात प्रथम विना शस्त्रक्रिया पर्यायांचा विचार केला जातो आणि रुग्णांच्या आरोग्यस्थितीनुसार उपचाराची दिशा ठरवली जाते.

अध्यक्ष डॉ. दिलीप माने यांनी सांगितले की, लठ्ठपणा हा बहुआयामी आजार असल्याने एकाच छताखाली तज्ज्ञांची टीम एकत्र काम केल्यास अधिक प्रभावी परिणाम मिळतात. या केंद्राच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानासह लठ्ठपणा उपचारात नवे परिवर्तन घडवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

## बेलापूरात महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद




**बेलापूर : (समर्थ गांवकरी)**

सर्वसामान्य नागरिकांच्या महसूल विषयक प्रलंबित अडचणी तात्काळ सोडवण्यासाठी आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर शनिवारी (दि. १४) बेलापूर येथे उत्साहात पार पडले.

या शिबिरात शेकडो लाभार्थ्यांच्या विविध कामांचा जागेवर निपटारा करण्यात आला. विविध दाखले, आदेश आणि डिजिटल कागदपत्रांचे तात्काळ वाटप झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात महसूल विभागाच्या अनेक सेवांचा लाभ नागरिकांना एका ठिकाणी उपलब्ध करून देत प्रशासनाने त्यांच्या अडचणी तत्काळ मार्गी लावल्या. शिबिरादरम्यान फेरफार नोंदींची ९५ प्रकरणे, सात-बारा दुरुस्तीच्या ६ अर्जांवर कार्यवाही करण्यात आली. याशिवाय २६८ डिजिटल सात-बारा व आठ-अ कागदपत्रांचे वितरण, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत १५ लाभार्थ्यांना आदेश, १४८ उत्पन्न आणि ७६ रहिवासी दाखले, एक खिडकी योजनेअंतर्गत ३०४ विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

> "सामान्य नागरिकांची महसूल विषयक कामे विनाविलंब आणि पारदर्शक पद्धतीने मार्गी लागावीत, हा महसूल समाधान शिबिराचा मुख्य उद्देश आहे. बेलापूर येथे नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा प्रशासनावर असलेल्या विश्वासाचा द्योतक आहे. अशा शिबिरांमुळे लोकांची प्रलंबित कामे जागेवरच पूर्ण होऊन त्यांना दिलासा मिळतो."
>
> **- किरण सावंत पाटील, प्रांताधिकारी, श्रीरामपूर**

## लाभार्थ्यांना विविध दाखल्याचे वाटप


**नेवासा फाटा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा तहसील कार्यालयामध्ये आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी लाभार्थ्यांना विविध दाखल्याचे वाटप प्रांताधिकारी सुधीर पाटील व नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व सहकार महर्षी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार घालून शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.मंडलाधिकारी अनिल गव्हाणे यांनी स्वागत करून प्रास्ताविकात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात शासनाने राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.सहायक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार यांनी विविध उपक्रमाची माहिती यावेळी बोलतांना दिली.

## जागतिक अनिश्चिततेतही पुण्यातील एसएमईंचा विकासावरील विश्वास कायम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जागतिक बाजारपेठांमध्ये भू-राजकीय तणाव आणि व्यापारातील विस्कळीतपणामुळे अनिश्चिततेचे वातावरण असले तरी पुण्यातील लघु व मध्यम उद्योग (एसएमई) आपल्या विकासाच्या शक्यतांबाबत ठाम आत्मविश्वास दाखवत आहेत. स्थिर देशांतर्गत मागणी आणि धोरणात्मक व्यावसायिक नियोजनाच्या बळावर भारतीय एसएमई विस्ताराच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे विविध राष्ट्रीय अहवालांतून स्पष्ट होत आहे.



सिडबी (SIDBI) एमएसएमई आउटलुक सर्व्हेनुसार, आर्थिक वर्ष २०२६ च्या दुसऱ्या तिमाहीत आयात शुल्काचा दबाव असल्याने आशावादात काहीशी घट दिसली असली तरी सणासुदीचा काळ, स्थिर बाजारपेठेतील मागणी आणि जीएसटीचे सुलभीकरण यांसारख्या उपाययोजनांमुळे आगामी तिमाहींबाबत सकारात्मक अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहेत.

पीएचडी चेंबरच्या एसएमई मार्केट सेंटिमेंट इंडेक्सनुसार, मागणी आणि रोजगाराबाबत काही चिंता असल्या तरी देशातील उद्योजक भांडवली गुंतवणुकीत वाढ करण्याच्या तयारीत आहेत. पुरवठा साखळीतील सुधारणा आणि सक्रिय इन्व्हेंटरी व्यवस्थापनामुळे उद्योग आगामी काळातील वाढीसाठी सज्ज असल्याचेही दिसून येते. पुणे हे भारतातील सर्वात गतिशील एसएमई परिसंस्थांपैकी एक मानले जाते. जिल्ह्यात ४.५ लाखांहून अधिक नोंदणीकृत एमएसएमई आहेत. त्यामध्ये जवळपास १ लाख उत्पादन युनिट्स आणि ३.५ लाख सेवा क्षेत्रातील उद्योग समाविष्ट असून त्यामुळे पुणे महाराष्ट्रातील सर्वात मोठे आणि वैविध्यपूर्ण एमएसएमई केंद्र ठरते.

अभियांत्रिकी कौशल्य, ऑटो कंपोनंट मॅन्युफॅक्चरिंग, आयटी सेवा, अचूक उत्पादन आणि कुशल मनुष्यबळाची उपलब्धता यामुळे जागतिक अनिश्चिततेच्या काळातही पुणे स्पर्धात्मक आघाडीवर आहे. स्थानिक उद्योग तंत्रज्ञान उन्नती, उत्पादन वैविध्यीकरण आणि निर्यात विस्तारासाठी गुंतवणूक करत आहेत. कोटक महिंद्रा बँकेचे एसएमई प्रमुख शेखर भंडारी म्हणाले, "भारतातील एसएमई, विशेषतः पुण्यासारख्या औद्योगिक केंद्रांतील उद्योग अपवादात्मक स्पष्टता आणि महत्त्वाकांक्षा दाखवत आहेत. त्यांचा दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध दृष्टिकोन त्यांना भविष्यातील मोठे उद्योगसमूह बनण्याच्या दिशेने नेतो."

वाढत्या उद्योग मागणीला प्रतिसाद देण्यासाठी कोटक महिंद्रा बँक पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि कोल्हापूर यांसारख्या एमएसएमई केंद्रांमध्ये आपली उपस्थिती वाढवत आहे. या विस्तारामुळे उद्योगांना जलद आणि सुलभ आर्थिक सेवा उपलब्ध होणार आहेत.

अहमदनगर, बारामती, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसह व्यापक पुणे प्रदेश मजबूत कनेक्टिव्हिटीमुळे एक प्रभावी एसएमई कॉरिडॉर तयार करत आहे.

## विशाल छुगेरा प्रॉपर्टीजतर्फे चॅनेल पार्टनर्स संमेलनाचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एन.ए. प्लॉटिंग क्षेत्रातील अग्रणी विशाल छुगेरा (व्ही. सी. प्रॉपर्टीज) पुढाकाराने विमाननगर येथील हॉटेल ग्रँड हयात येथे आयोजित चॅनेल पार्टनर्स संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे आणि परिसरात रिअल इस्टेट क्षेत्रात काम करणाऱ्या जवळपास ६०० व्यावसायिकांनी संमेलनाला हजेरी लावत व्ही. सी. प्रॉपर्टीजच्या बंगलो प्रकल्पांविषयी जाणून घेतले. कंपनीच्या आगामी प्रकल्पांची संकल्पना, त्यामागील नियोजन, तसेच ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि गुंतवणुकीच्या संधी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. व्ही. सी. प्रॉपर्टीजचे चेअरमन विशाल छुगेरा, संचालक अमन छुगेरा व क्रिश छुगेरा, मार्गदर्शक व सल्लागार दर्शन चावला आणि किशन मिलानी उपस्थित होते.



विशाल छुगेरा म्हणाले, "रिअल इस्टेट क्षेत्रात विश्वास, पारदर्शकता आणि गुणवत्तेला सर्वाधिक महत्त्व आहे. ग्राहकांच्या अपेक्षा ओळखून त्यानुसार नियोजनबद्ध प्रकल्प उभारणे ही आमची प्राथमिकता आहे. एन.ए. प्लॉटिंग आणि बंगलो प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही गुंतवणूकदार आणि घर खरेदीदारांना सुरक्षित व दीर्घकालीन मूल्य देण्याचा प्रयत्न करत आहोत. पुणे आणि आसपासच्या परिसरात वाढत्या नागरीकरणामुळे स्वतंत्र घर, बंगलो प्रकल्प आणि प्लॉटिंगला मोठी मागणी निर्माण होत आहे. नियोजनबद्ध पायाभूत सुविधा, उत्तम कनेक्टिव्हिटी आणि नैसर्गिक वातावरणाचा समतोल राखत प्रकल्प विकसित करण्यावर कंपनीचा भर आहे. 'जमीन विकत घ्या, देव आता ती बनवत नाही' प्रॉपर्टीजचा असा नारा आहे."

"व्ही. सी. प्रॉपर्टीज गेल्या २१ वर्षांपासून एन. ए. प्लॉटिंग आणि बंगलो प्रकल्पांमध्ये कार्यरत असून, प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी आमच्या ब्रँड अँबेसेडर आहेत. आजवर १५ पेक्षा अधिक प्रकल्पातून, २५०० हुन अधिक समाधानी ग्राहकांना लाखो स्क्वेअर फूट जमीन आम्ही विकली आहे. पुण्यापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या केसनंद येथे निवान मेडोस हा ८० एकरात, तर बकोरी येथे निवान ग्रुँड्यअर २५ एकरात असे दोन बंगलो प्रकल्प आहेत. चॅनेल किंवा ग्रोथ पार्टनर्स आमच्या व्यवसायाचा कणा असून, या प्रकल्पांतून त्यांना उत्तम व्यवसाय मिळावा, गुंतवणूकदारांना लाभ व्हावा, ज्यांना आपले पहिले घर बंगला व्हावे, असे वाटते, त्यांना ही संधी देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

या संमेलनाच्या माध्यमातून चॅनेल पार्टनर्सना कंपनीच्या विविध प्रकल्पांची माहिती देण्याबरोबरच त्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध झाली. कार्यक्रमादरम्यान रिअल इस्टेट क्षेत्रातील बदलते ट्रेंड, गुंतवणुकीच्या संधी आणि ग्राहकांच्या अपेक्षा यावरही चर्चा करण्यात आली. संमेलनाच्या शेवटी उपस्थित चॅनेल पार्टनर्सशी संवाद साधत कंपनीच्या आगामी योजनांविषयी माहिती देण्यात आली.

## स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरात हे समाजविकासाचे कृतिशील संत

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

वयाच्या 19व्या वर्षी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेणाऱ्या भाऊसाहेब थोरात यांनी आयुष्यभर शब्दांचा पक्केपणा आणि मनाचा सच्चेपणा जपला. स्वातंत्र्यसंग्राम, सर्वसामान्यांसाठी तळमळ, आंदोलने चळवळी, मोर्चे याचबरोबर तालुक्याच्या विकासाची पायाभरणी करताना त्यांनी सामान्य माणसाच्या विकासासाठी आयुष्य समर्पित केले. वयाच्या 84 व्या वर्षी दंडकारण्य अभियान देणारे स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरात समाज विकासासाठी आयुष्यभर झटणारे कृतीशील संत असल्याचे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक मल्हार अरणकल्ले यांनी काढले आहे.

## 'सेव्ह दी फूट' हे 'एआय' अॅप सादर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

मधुमेहाच्या रुग्णांच्या पायांच्या जखमांचे (फूट अल्सर) व्यवस्थापन अधिक वेगाने आणि प्रभावीपणे करण्यासाठी 'सेव्ह दी फूट' हे नवे आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'वर (एआय) आधारित मोबाइल अॅप शनिवारी (१४ मार्च) आज पुण्यात पार पडलेल्या १०व्या आंतरराष्ट्रीय मधुमेह परिषदेत सादर करण्यात आले. रुग्णांचे पाय कापले जाण्यापासून वाचवणे, हा या तंत्रज्ञानाचा मुख्य उद्देश आहे. मधुमेहामुळे पायाला होणाऱ्या जखमा ही एक गंभीर समस्या आहे. यावर योग्य वेळी उपचार झाले नाहीत, तर संसर्ग वाढून पाय कापण्याची वेळ येऊ शकते. 'सेव्ह दी फूट' हे अॅप स्मार्टफोनच्या माध्यमातून डॉक्टरांना आणि रुग्णांना या समस्येवर स्मार्ट आणि सोपा उपाय उपलब्ध करते. हे अॅप डॉक्टरांना निर्णय घेण्यासाठी मदत करणारे महत्त्वाचे साधन म्हणून काम करते. 'एआय' पॉवर्ड 'इमेज कॅप्चरिंग'च्या मदतीने हे अॅप पायाच्या जखमेच्या फोटोंचे विश्लेषण करते. त्यानंतर जखमेचा आकार आणि तिची गंभीरता तत्काळ ठरवते. या जलद विश्लेषणामुळे डॉक्टरांना उपचारांबाबत तातडीने आणि अचूक निर्णय घेणे सोपे होते; जे जखम लवकर भरून येण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. याशिवाय हे अॅप 'एसमॉलॉल हायड्रोक्लोराइड'सारख्या प्रगत उपचारांशी सुसंगत आहे. देशात उपलब्ध असलेले हे आधुनिक उपचार जखम पूर्णपणे बरी करण्यासाठी प्रभावी ठरतात. हे उपचार जखम भरून येण्याच्या तिन्ही महत्त्वाच्या टप्प्यांवर (सूज कमी करणे, पेशींची वाढ आणि त्वचेची पुनर्निर्मिती) काम करतात आणि जखम पुन्हा उद्भवण्यापासून रोखतात.




## 'रोटरॅक्ट डिस्ट्रिक्ट'च्या डीआरआरएनपदी अॅड. सत्यजित कराळे

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रोटरॅक्ट डिस्ट्रिक्ट ३१३१ च्या डिस्ट्रिक्ट रोटरॅक्ट रिप्रेझेंटेटिव्ह नॉमिनी (डीआरआरएन) या पदावर अॅड. सत्यजित शिवाजीराव कराळे पाटील यांची निवड झाली आहे. त्यांच्या निवडीने युवक नेतृत्व आणि सेवा उपक्रमांना त्यांच्या कार्यकाळात नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. व्यवसायाने वकील असलेले कराळे पाटील यांनी फौजदारी, सायबर तसेच एनडीपीएस कायद्यात विशेष प्राविण्य मिळविले आहे. व्यावसायिक कामकाजाबरोबरच सामाजिक कार्य आणि युवक नेतृत्व घडविण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. कराळे पाटील यांनी २०१५ साली रोटरॅक्ट क्लब ऑफ मराठवाडा मित्र मंडळ, पुणे कोथरूड या क्लबचे चार्टर मेंबर म्हणून रोटरॅक्टमध्ये प्रवेश केला. सेवाभावातून सुरू झालेला त्यांचा प्रवास पुढील दशकभरात विविध नेतृत्वाच्या जबाबदाऱ्यांमधून अधिक व्यापक झाला. रोटरॅक्टमधील कार्यकाळात त्यांनी क्लबपासून जिल्हास्तरापर्यंत अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. २०१९–२० या वर्षात क्लबचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांच्या नेतृत्वाखाली १३७ हून अधिक सेवा प्रकल्प राबविण्यात आले. समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.



# रुग्ण हक्क परिषदेचा शिवसन्मान पुरस्कार प्रेरणादायी

### भानुप्रताप बर्गे यांचे मत; शिवजयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'शिवसन्मान पुरस्कार' प्रदान

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

तळागाळात काम करणाऱ्या, गरिबांची मदत करणाऱ्या, निस्वार्थी समाजसेवा करणाऱ्या तसेच विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या मान्यवरांचा रुग्ण हक्क परिषद दरवर्षी शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरव करते. रुग्ण हक्क परिषदेचा हा शिवसन्मान पुरस्कार अनेकांना समाजकार्यासाठी प्रेरणा देणारा आहे, असे मत माजी सहाय्यक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे यांनी व्यक्त केले.



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त लालमहल येथे आयोजिलेल्या शिवसन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात भानुप्रताप बर्गे बोलत होते. प्रसंगी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण, माजी विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर, सह्याद्री हॉस्पिटलचे उपाध्यक्ष सचिन कुलकर्णी, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक भारत देसडला, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे मुख्य अधीक्षक डॉ. हनुमंत चव्हाण, राजाभाऊ कदम, लहुजी शक्ती सेनेचे अमोल चव्हाण, गोविंद साठे आदी उपस्थित होते.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने या सोहळ्यात उद्योग, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, सांस्कृतिक, राजकीय, विधी व न्याय तसेच क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १०१ मान्यवरांचा लाल महल येथे शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मानचिन्ह, पुस्तक, उपरणे आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. यामध्ये अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे कोषाध्यक्ष अनिल गुंजाळ, माजी शासकीय अधिकारी देवेंद्र दलाल, युवा पत्रकार राधिका वळसे पाटील, सज्जद सय्यद, अनिल खुडे, लक्ष्मण साबळे, दलित पँथरच्या प्रदेशाध्यक्ष स्नेहा माने, ह.भ.प. विष्णु महाराज चामनर, हरजीवन हॉस्पिटलचे डॉ. सागर रोकडे, आदर्श शिक्षिका राखी रासकर, गायिका शिल्पा पांचाळ, नगरसेवक निलेश आल्हाट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संजय भंडारे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे शासकीय अधिकारी शितल फत्तेपुरे, समर्थ सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते शिवराज माळवदकर, तृतीयपंथी कार्यकर्त्या प्रीती लाटे, भाकर फाउंडेशन मुंबईचे अॅड. दीपक सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रातील १०१ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. उमेश चव्हाण म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी आणि न्यायासाठी दिलेली प्रेरणा समाजासाठी मार्गदर्शक आहे. त्याच विचारातून रुग्ण हक्क परिषद आरोग्य क्षेत्रात सर्वसामान्यांना न्याय मिळावा यासाठी सातत्याने काम करत आहे. समाजासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या व्यक्तींना शिवसन्मान पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा उद्देश असून, यामुळे समाजातील इतरांनाही प्रेरणा मिळते." समाजासाठी सकारात्मक काम करणाऱ्या व्यक्तींना अशा प्रकारे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या कार्याची दखल घेतली जावी, यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविला जात असल्याचे त्यांनी सांगितले.